|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet Containing Periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

आपली आहे प्रगतीची

# वाटचाल

* वर्ष १५ वे, अंक ३ * दि. १५ सप्टेंबर २०१५ * किंमत रु. २०/-



देवधर मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस
अध्यक्ष श्री. पु. गो. देवधर आणि माजी अध्यक्ष श्री. कर्नल देवधर यांचे शुभहस्ते
केशवराज पूजन व दीपप्रज्वलन करून झाली.

# देवधर मंडळ कार्यकारिणी (१/४/२०१३ ते ३१/३/२०१६)

**अध्यक्ष**
पुरुषोत्तम गोपाळ देवधर (कु. वृ. पान. ३६०)
ब्लॉक नं. २, भागीरथी टॉवर्स, स.नं. ६, हि. नं. ११,
कोकण एक्सप्रेस, हॉटेल लेन, कोथरुड पुणे-४११०३८
दूरध्वनी- ९८६०३०६३४४, ०२०/२५४५६७५०
e-mail : pgdeodhar@gmail.com

**उपाध्यक्ष**
वासुदेव नारायण देवधर (कु. वृ. पान. ४९७)
सी-३/१०२, सॅटेलाईट क्लासिक, जुने सी. एस. सी. कंपाऊंड,
गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०००६०
दूरध्वनी २८२६१०२८,२८२४६०४२

सुरेश विश्वनाथ देवधर (कु. वृ. पान. २१)
१०२, आय् विंग, प्रणयनगर, राम मंदिर रोड (विस्तारित)
बाभई, बोरीवली (प.), मुंबई-४०००९१
दूरध्वनी : ०२२/२८९८१८५६
e-mail : suresh.deodhar@gmail.com

**कार्यवाह**
सौ. सरिता मुकुंद देवधर (कु.वृ.पान ३५९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगावकर बिल्डिंग नं. ६,
गिरगाव, मुंबई-४००००४ दूरध्वनी ०२२/२३८५४८११

**सहकार्यवाह**
विजय गंगाधर देवधर
(पुणे विभाग कार्यवाह)
गौरी शंकर, १४ गोवर्धन सोसायटी,वीर सावरकर नगर,
पुणे-४११०३७. दूरध्वनी :०२०-२४२६४३२, ८३०८८०५८९५
e-mail : deodharvg@yahoo.co.in

**कोषाध्यक्ष**
अकल्पिता चिंतामणी देवधर (कु. वृ. पान. ८९८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गांवदेवी चौक, कल्याण
मोबाइल : ९८२०३५६४१३
e-mail : cdakalpita@yahoo.co.in

**सहकोषाध्यक्ष (स्वीकृत)**
नितेश नारायण देवधर (कु. वृ. पान. ४७३)
फ्लॅट नं. १२, भारत सावली अपार्ट.२ रा मजला, कल्पतरु टॉवर
समोर, सखाराम कॉम्प्लेक्स, डोंबिवली (प.)
मोबाइल : ९००४१९८९०३
e-mail : nitesh.devdhar@gmail.com

**वाटचाल (स्वीकृत)**
आशिष राम देवधर (कु. वृ. पान. ३१)
अतिथी संपादक, वाटचाल
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका,
कल्याण (प.) ४२१३०१ दूरध्वनी : ०९८३३५११५९३
e-mail : ashish.ram.deodhar@gmail.com

**सभासद**
मधुसूदन दत्तात्रेय देवधर (कु.वृ.पान ५३१)
११५२,'राधाकृष्ण' सुभाष नगर, १ ली गल्ली, शुक्रवार पेठ,
पुणे-४११००२, दूरध्वनी ०२०-२४४७८१६०

हेमंत यशवंत देवधर (कु. वृ. पान. ३१७)
श्री. विवेकानंद को. ऑप. हौ. सोसा., बिल्डिंग नं. १६, ब्लॉक नं.
२, तळमजला, गुरुमंदिरासमोर, सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू.)
मोबाइल : ९८३३००७०६४
e-mail : hemant3232@rediffmail.com

नरेश कृष्णाजी दीक्षित (कु. वृ. पान. ७२५)
ब ९, ॐ भैरवी सोसा., सम्राट हॉटेल बिल्डिंग,
पं. दीनदयाल मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२
e-mail : nareshdixit1949@gmail.com

डॉ. सुनिल गोपाळ देवधर (कु. वृ. पान. ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर,
नाशिक रोड, नाशिक ४२२१०१. फोन : (०२५३)२४६४७८०
मोबाईल : ९८५०६५४२५०
e-mail : deodharsunil@rediffmail.com

अविनाश दिवाकर देवधर (स्वीकृत) (कु. वृ. पान. ९६७)
२, लक्ष्मी विनायक सोसा., मंजुनाथ शाळेशेजारील गल्ली, पाथर्ली,
डोंबिवली (पूर्व) दूरध्वनी ०२५१-२४४५२६२
मोबाइल : ९२२४२६४९६९
e-mail : avinash.deodhar@gmail.com

रविश देवधर (स्वीकृत) (कु. वृ. पान. २०२)
ब्लॉक नं. २, आर्य अपार्ट., तळमजला, मराठी शाळेच्या मागे,
पोस्ट - रावतळे, चिपळूण, रत्नागिरी-४१५६०५
दूरध्वनी : ९४२११८९४३५०

**विशेष निमंत्रित**
रवींद्र प्रभाकर देवधर (कु. वृ. पान. २०८)
एच १०३, इंटरनिटी को.हौ.सो. इंटरनिटी मॉल शेजारी, तीन हात
नाका, ठाणे (प.) ४००६०४ मोबाइल :९८२०२८४१८३
e-mail : ravi_deo@hotmail.com

**पदसिद्ध सभासद**
नारायण(दिलीप)गोविंद देवधर (कु.वृ.पान ४१८)
बी-१०३ RNA हाईटस्, जोगेश्वरी-विक्रोळी जोड मार्ग
(लिंक रोड),अंधेरी, मुंबई-४०००९३.
दूरध्वनी: ०२२/२८२५२१४५ मोबाईल : ९८१९९७२५११
e-mail : deodhardilip@yahoo.com

**मानद लेखा परीक्षक**
किरण अनंत देवधर (कु. वृ. पान. १६२)
१०, वेदवती सोसायटी, स्वामी विवेकानंद मार्ग,
संजीवन हॉस्पिटलसमोर, अंधेरी (पूर्व) मोबाइल :९८२०३३५०९३

अध्यक्षीय मनोगत

# निसर्ग आणि माणूस

नेपाळमध्ये भुकंप झाला. सर्व जमीन थरथरली. घरांचा तोल ढासळला. जे घर आधारासाठी बांधले त्यानेच अनेकांचे जीव घेतले. सुरक्षा रक्षकांनीच गोळ्या घालाव्यात तसेच झाले हो हे! घरांची भिंती वाढून लोक उघड्या मैदानात तंबू ठोकून राहू लागले. घरातील सख्खे भाऊ-बहीण, आई-वडील मृत पावले. त्याच्यावर दु:खाचे अश्रू ढाळण्यास डोळ्यात पाणी नाही असे निष्प्राण डोळे झाले. कोणासाठी कोण रडणार!

सर्व जग हळहळले. मदतीचा ओघ सुरू झाला. अन्न, पाणी, कपडा, निवारा सर्वांचीच वानवा. पण मानवी मन एकमेकांसाठी तुटते. युद्धात एकमेकांच्या जीवावर उठलेलेही अशा प्रसंगी उठून मदत करतात. अशा वेळी सर्वात मोठा शत्रू निसर्गच झालेला असतो. निसर्गाच्या ताकदीपुढे सर्वजण हतबल होतात. कोणी कितीही शोध लावले तरी ''देव मारी त्याला कोण तारी'' असे म्हणावेसे वाटते.

भारतातही हे भूकंपाचे धक्के जाणवले, अनेकांनी आपले प्राण गमावले. परंतु तीव्रता कमी असल्याने ती मोठी बातमी होऊ शकली नाही.

यावेळी 'सुनामी' ची आठवण झाली. काही क्षणात समुद्राने रौद्र रूप धारण केले व शेकडो माणसांना पोटात घेतले. आपण काही करू शकत नाही. शास्त्रात संशोधन करून निसर्गाचे नियम जाणण्याचा आपण खूप प्रयत्न केला, त्यात काही प्रमाणात यशही मिळविले, मिळवतोय. परंतु भूकंप कधी होणार हे थोडे आधी समजू शकेल पण तो आपण थांबवू शकत नाही. थोडी सावधानता बाळगून जीवित हानी कमी करू शकतो एवढेच.

निसर्गावर आपला ताबा नाही हे मान्य परंतु आज माणूस माणसावरही ताबा ठेवू शकत नाही. माणसाच्या मनातील विध्वंसक वृत्ती वाढीस लागल्या आहेत असेच म्हणावे लागेल.

आपणच आपला नाश करण्यासाठी पुरेशी व्यवस्था केली आहे. अनेक अणुबॉंब सर्वांनीच तयार केले आहेत. केव्हा कोण माथेफिरू त्यांचा स्फोट करेल व अनेकांचे प्राण जातील हे सांगणे कठीण आहे. दहशतवादी अनेक निरपराध लोकांचे जीव घेत आहेत. अनेक लहान मुलांच्या हातात मशीनगन सारखी हत्यारे पडत आहेत. त्यांना आपण काय करत आहोत याची जाणीवही होत नाही अशी कृत्ये ती करीत आहेत. आपण झुरळ मारतो तशी माणसांची हत्या होत आहे.

स्त्री गरोदर राहिली की आजही केवळ खेड्यांमध्ये नव्हे तर शहरांमध्येही गर्भजलचिकित्सा केली जाते. न्यायालयाने अवैध ठरवले तरी असे प्रकार घडत आहेतच. मुलींचा जन्माआधीच बळी घेतला जात आहे. ज्येष्ठांच्या मनाविरुद्ध लग्न केले म्हणून त्यांच्या प्रेमाचा अंत त्यांचा बळी घेऊन केला जात आहे. त्याला जातपंचायतीचा गोंडस मुलामा दिला जात आहे.

'वसुधैव' सारखा दिव्य विचार भारतीय संस्कृतीने जगास दिला. सर्वांनी एकाच कुटुंबाचे सदस्य असल्यासारखे वागावे व सर्वांवर प्रेम करावे अशी उच्च विचारसरणी आपला धर्मच देऊ शकतो. 'सर्व धर्म समभाव' हे आपल्याच रक्तात आहे. ज्या विचारसरणीने स्वामी विवेकानंदांनी धर्मसभा जिंकली, तो धर्म जगाला योग्य दिशा देण्यास सज्ज आहे. तो मार्ग चालण्याची इतरांचीही तयारी हवी. त्यासाठी इतर मार्ग बंद होण्याची वाट पाहायची काय? ते मार्ग बंद होण्यासाठी तिसऱ्या महायुद्धाची वाट पाहायची काय? आपण आधीच शहाणे का होऊ शकत नाही? की तशीच ईश्वरेच्छा आहे? महाभारताचे युद्ध घडावे हीच श्रीकृष्णाची इच्छा होती. म्हणून दुर्योधनाचे मतपरिवर्तन त्याने केले नाही. ईश्वराची काय इच्छा आहे तोच जाणे!

# संवाद – घरगुती औषधांच्या निमित्ताने

– श्री. अविनाश दिवाकर देवधर
डोंबिवली

आज वाटचालचा लेख लिहिताना मला प्रभातमध्ये काम करणाऱ्या शांताराम आठवलेंनी १९७६ साली सुखाची लिपी या पुस्तकात लिहिलेल्या एक गोष्टीची आठवण होत आहे.

१९६९-७० चा तो काळ असेल. महाडच्या एका महाविद्यालयामध्ये दोन जर्मन गृहस्थ उतरले होते. भल्या पहाटे ते दोघे उठत, सकाळचे सगळे प्रातर्विधी आटपून दोन्ही खांद्यावर पिशव्या अडकवून जंगलात निघत. नाष्टा, भोजन व पाणी सोबत असे. एकदम संध्याकाळी सूर्य मावळल्यावर ते परतत असत. आठवलेंनी उत्सुकतेने त्यांना ''तुम्ही रोज जंगलात जाऊन काय करता?'' असं विचारलं. त्यावेळी ते म्हणाले, ''आम्ही या जंगलातील औषधी वनस्पतींचे नमुने गोळा करीत आहोत व त्याचे रासायनिक विश्लेषण करून कोणत्या रोगावर त्या उपयोगात येतील याचा विचार करीत आहोत.''. पुढे त्या जर्मन लोकांनी विचारले, ''भारताला स्वातंत्र्य मिळून किती वर्षे झाली? ब्रिटीशांनी त्यांनी माहीत असलेली ॲलोपॅथी तुमच्या डोक्यावर लादली. पण चरक व सुश्रुताने संपन्न अनेक वनौषधी असलेल्या भारताला आपली आयुर्वेदिक औषधप्रणाली का उभी करता आली नाही?''

त्या जर्मनी लोकांनी विचारलेला प्रश्न १९७६ पासून आजतागायत मला छळतो आहे. आयुर्वेदाचा विचार बाजूला ठेवा पण अगदी व्यावहारिक शहाणपण म्हणून का होईना - इथल्या वनस्पतींचा, औषधी उपयोग म्हणून, त्यावर संशोधन होऊन, त्यांचा संपूर्ण देशासाठी उपयोग होऊ शकेल अशी औषधं उत्पादन व्यवस्था व प्रणाली का नाही उभी राहू शकली? घराघरातून अनेक घरगुती जडीबुटी स्वरुपातील औषधे मागील काही वर्षापर्यंत वापरात होती. खेड्यापाड्यांमध्ये, आदिवासी व वनवासी क्षेत्रांमध्ये काही रामबाण औषधे अजूनही वापरात आहेत. चरक संहिता, सुश्रुत संहिता, वाग्भट योगरत्नाकर अशांसारख्या आधारभूत ग्रंथांमध्ये आयुर्वेदाविषयी सखोल अभ्यास उपलब्ध आहे. पण त्यावर आधुनिक चाचणी शास्त्राची कसोटी लावून ते जागतिक स्तरावरती प्रचलित करण्याच्या दृष्टीने म्हणावे तसे प्रयत्न होताना दिसत नाहीत.

सगळयांची एकच ओरड असते की, आयुर्वेदामध्ये रिसर्च म्हणजेच संशोधन होतच नाही. पण यासाठी आम्हीच संशोधन करायला हवे असे कोणाच्याच बोलण्यात येत नाही. नाही म्हणता देशस्तरावरील 'आयुष' संकल्पनेद्वारे काही प्रमाणात संशोधन सुरू झाले आहे. भारतीय वनस्पती कोष तयार झाला आहे. यामध्ये साधारणत: २५० ते ३०० वनस्पतींची माहिती आहे. त्यात असलेल्या घटकांची माहिती आहे व त्यांची चाचणी करण्याच्या पद्धती दिलेल्या आहेत. तसेच अनेक पारंपारिक पाठांचीही माहिती आहे. आयुर्वेदात अनेक पाठ पारंपारिक परंपरेनुसार चालत आलेले आहेत. पण बदलत्या काळानुसार, काळाच्या गरजेनुसार अनेक बदल घडून आणणे ही काळाची गरज आहे. पथ्यापथ्याचा काळानुसार विचार होणे आवश्यक आहे. औषधपाठांच्या गुणवत्ताचाचणीसंबंधात नवीन निकष लागणे गरजेचे आहे. आयुर्वेदिक औषधी वनस्पती उत्पादनासीठी निश्चित, प्रमाणित या स्टँडर्ड पद्धती शोधल्या पाहिजेत. वनस्पती औषध उत्पादनासंदर्भात नवीन तंत्रज्ञान शोधले पाहिजे. हे आमच्यासारख्या सुविद्य ब्राह्मण वर्गाने विचारात घेतले पाहिजे.

# औषधविक्री व्यवस्था

औषध ग्राहकांपर्यंत पोहोचण्याच्या सद्यस्थितीतील वितरण व्यवस्थेमुळे ग्राहकाला औषध मूळ किमतीच्या ८ ते १० पट किंमत जास्त द्यावी लागते. लाख दोन लाख वस्तीच्या परिसरामागे एक घरगुती व छोटा औषधी उत्पादन उद्योग उभारून हा वितरण व्यवस्थेतील भार कमी होऊ शकतो.

जुन्या काळी गावागावांमध्ये वेगवेगळ्या रोगांवर रामबाण तात्काळ परिणाम करणारी अनेक जडीबुटी व वनस्पती औषधे ब्राह्मणांकडे उपलब्ध होती. सर्वसाधारण आजारांवरील औषधांची गरज भागवली जात होती. औषधेही कमी किमतीत उपलब्ध होत होती. हीच व्यवस्था नवीन स्वरुपात आताही आणता येऊ शकते. निदान ब्राह्मणांनी आपल्या परिसरातील ब्राह्मण व गरजू लोकांसाठी अशी व्यवस्था उपलब्ध करावी. त्यामुळे महिन्याची माणशी औषधांवरील खर्च रु १५०० वरून रु. ५०० पर्यंत खाली येऊ शकतो.

१९६० साली गावागावांमध्ये शेती, वैद्यकीय शिक्षण, ज्योतिष व पौरोहित्य हे सगळे व्यवसाय ज्यात नैतिकता आवश्यक होती, ते ब्राह्मण करत होते. त्यामुळे समाजाशी आदरयुक्त वचक असा संबंध होता. शेती गेली. आणि व समानधानकारक उत्पन्न देणारी कोणतीच नोकरी न मिळाल्यामुळे बाकी व्यवसाय केले जातात. त्यामुळे समाजाशी खऱ्या अर्थाने संबंध संपला व ब्राह्मण सर्वसामान्य झाला. चांगला पगार देणाऱ्या नोकऱ्यांमधील ब्राह्मण, दिवसातील १४-१४ तास घरापासून व समाजापासून दूर झाला. कुटुंबाशीही म्हणावे तसे नाते राहिले नाही. मध्यम स्तरातील ब्राह्मणांच्या घरी दोघांनाही नोकरी करणे भाग आहे. त्यामुळे घरातील वृद्ध व लहान मुलांशी सहवास कमी झाला व वृद्धाश्रम व पाळणाघरांसारखे पर्याय मन मारून स्वीकारावे लागले.

हे सर्व बदलायचे असेल व पुन्हा कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक स्थैर्य प्राप्त करून घ्यायचे असेल तर वर निर्देश केलेल्या व त्यासारख्या नवीन व्यवसायांमध्ये उदा. कॅटरिंग, टुरिझम, डिस्ट्रिब्युशन, उपकरणे व यंत्रे दुरुस्ती, सेवाक्षेत्रे इ. व्यवसायात उतरणे आवश्यक आहे.

नर्सरी स्कूल, वसतीगृहे, पाळणाघरे, शैक्षणिक क्लासेस, वृद्धाश्रम यासारख्या क्षेत्रांमध्ये व्यवसाय करून नैतिकता राखली पाहिजे. सुशिक्षित ब्राह्मणांनी वैज्ञानिक दृष्टीकोनातून आपल्या धर्मग्रंथांचा व संस्कृतीचा अभ्यास करून पौरोहित्यासारख्या पेशाला प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे. मानसशास्त्राच्या पदवीधरांनी व सिव्हिल इंजिनिअरनी डोळसपणे ज्योतिष, वास्तूशास्त्र याचा अभ्यास करून समाजाला आदर्श मार्गदर्शक म्हणून काम करावे. अशाने समाज पुन्हा जोडला जाऊ शकतो. आणि हे पुढील काळात आवश्यक आहे. थोडक्यात ही काळाची गरज आहे.

आता येणाऱ्या संमेलनामध्ये यादृष्टीने काही विचार व ठोस योजना ठरवुयात. संमेलनामध्ये काही विशेष कार्यक्रम घेऊन सहभागी व्हा. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरील आपल्या देवधर दीक्षित व ढमढेरे कुलबंधु-भगिनींनी पुढील वर्षभरासाठी काही उपक्रम करायला सुरुवात करा. एकत्र या, संमिलित व्हा व पुढील पिढीसाठी आधारभूत व मार्गदर्शक व्हा.

***

अविनाश दिवाकर देवधर
०२५१-२४४५२६२, ९२२४२६४९६९
avinash.deodhar@gmail.com

# सेवायज्ञ

**– संपदा वागळे**

''माझ्या आयुष्याला नवं वळण देणारा दिवस... ४ जून १९६२. याच दिवशी माझं या शाळेशी (मुलुंडमधील पुरंदरे हायस्कूल) नातं जडलं. मुख्याध्यापक पायगांवकर सर आणि बर्डेबाई यांच्या प्रेमळ मार्गदशाखाली मी घडत गेले. चिमुकल्या सुनीलच्या अकाली मृत्यूच्या डोंगराएवढ्या दु:खातून सावरायला शाळेनेच हात दिला. तेव्हाच ठरवलं की यापुढचं आयुष्य जगायचं ते परिस्थितीमुळे ज्यांच्या चेहऱ्यावरचं हासू लोपलंय अशा जिवांना फुलविण्यासाठी...'' गेली पन्नास वर्षे 'कमी तेथे आम्ही' हा वसा घेऊन काम करणाऱ्या सुनीता देवधरबाई सांगत होत्या.

बाईंच्या सेवाकार्याला त्यांचे पती मधुकर देवधर यांनी तनमनधनाने साथ दिली, देत आहेत. पतीपत्नीच्या आयुष्याचं सार दोन वाक्यात सांगायचं तर ते असं सांगता येईल... ''जेव्हा त्यांच्याकडे पैसा नव्हता तेव्हा आर्थिक अडचणीत सापडलेल्या अनेक सामाजिक संस्थांना संपन्न करण्यासाठी त्यांनी समाजातील दानशूरांना साकडं घातलं. मात्र जेव्हा त्यांच्याकडे पैसा आला तेव्हा दुसऱ्यांकडे मदत मागण्याआधी स्वत:चा (घसघशीत) वाटा त्यांनी पुढे केला. विविध लोकपयोगी कामांसाठी गेल्या अनेक वर्षात त्यांनी जमा केलेल्या निधीने एक कोटी रुपयांचा आकडा पार केला आहे. तर त्यांच्या वैयक्तिक दानाने ६० लाख रुपयांची वेस ओलांडलीय. यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे मुलुंडमधील अनेक सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांच्या उभारणीसाठी त्यांनी जे श्रमाचं दान दिलय त्याला तोड नाही. संस्था व कार्यकर्ते उभे करणारी माणसं अशी या उभयतांची ओळख आहे.

देवधर पती-पत्नी दोघंही मूळचे पुण्याचे. लग्नानंतर १९६१ साली देवधरांच्या नोकरीच्या निमित्ताने ते मुलुंडकर झाले. बी.ए., बी.एड्. ही पदवी असल्याने बाई पुरंदरे हायस्कूलमध्ये कामाला लागल्या. तर मधुकररावांनी पेंट टेक्नॉलॉजीमध्ये एम. एस्सी. केल्याने विविध ठिकाणचा अनुभव घेऊन ठाण्यात स्वत:ची इंडस्ट्री सुरू केली आणि नंतर आपला व्यवसाय मॉरिशस, श्रीलंका, आफ्रिका या देशांपर्यंत वाढवल्या. बाईंनी शिक्षिकेपासून मुख्याध्यापकपदापर्यंत सर्व स्तरांवर काम करून १९९५ मध्ये याच शाळेतून निवृत्ती घेतली.

बाईंच्या समाजकार्याची मुहूर्तमेढ शाळेतच रोवली गेली. शाळेच्या मागेच असणाऱ्या विठ्ठलनगर झोपडपट्टीतील दहावीमधील मुलाला बाईंनी अनेक वर्षे इंग्रजी व समाजशास्त्र हे विषय एक पैसाही न घेता शिकविले. मुलुंडमधील सर्व माध्यमांच्या शाळातील ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर प्रशिक्षण वर्ग आयोजित करून आपल्या शाळेत त्याच्या स्पर्धा घेतल्या. ५० वर्षांपूर्वी पुरंदरे शाळेची इमारत तशी मोडकीतोडकीच होती. अशावेळी बाईंनी त्यांचे कौटुंबिक मित्र भाऊसाहेब केळकर (एस. एच. केळकर कंपनीचे मालक) यांच्याकडे शब्द टाकला आणि त्यांनी त्याकाळी ३ लाख रुपये बिनव्याजी दिले. त्यामुळे शाळा धट्टीकट्टी झाली. हे पैसे फेडण्यासाठी आणि नूतनीकरणासाठी फंड उभारायचं ठरलं तेव्हाही घरोघरी जाऊन लाखो रुपये जमविण्यात बाईंचा मोठा हात होता. त्याच्या या नि:स्वार्थी योगदानामुळे आज पुरंदरे हायस्कूल मोठ्या दिमाखात उभं आहे.

१९७२ मध्ये बाई समाजभावनेतून काम करणाऱ्या 'इनरव्हील क्लब' या आंतरराष्ट्रीय स्त्री

संघटनेच्या सदस्य झाल्या. आणि त्यांचं काम सुरूच राहिलं. कनिष्ठ मध्यमवर्गीयांसाठी मुलुंड (सेंटर) क्लबने सुरू केलेल्या निर्मलादेवी जैन मेडिकल सेंटरला त्यांनी तीन लाख रुपये दिले आणि सुनील मधुकर देवधर रोगनिदान केंद्र सुरू झालं. २०/२२ वर्षांपूर्वी मुलुंड जिमखाना आकार घेत असताना गरीब व होतकरू खेळाडूंना वाजवी फी मध्ये सराव करता यावा यासाठी त्यांनी दिलेल्या साडेतीन लाख रुपयांच्या निधीतून 'सुनीता मधुकर देवधर टेबल टेनिस हॉल' उभा राहिला. जिथे आज अनेक खेळाडूंचे प्रशिक्षण सुरू आहे. १९८०-८१ ला बाई मुलुंड क्लबच्या अध्यक्ष झाल्या, तेव्हा त्यांनी जी कामं केली त्यातलं एक म्हणजे झोपडपट्ट्यांमधील एक ते पाच वर्षाच्या मुलांना कुपोषणाच्यामुळे आलेला रातांधळेपणा घालविण्यासाठी केलेले 'ए' व्हिटॅमिनच्या डोसचे वाटप. सहा महिन्यांसाठी एकदा याप्रमाणे साडेतीन हजार मुलांसाठी हे अभियान सुरू होते.

२००३-०४ या वर्षी बाईंची जिल्हा अध्यक्ष या महत्त्वाच्या पदावर निवड झाली आणि त्यांनी या संधीचं सोन केलं. चर्चगेट ते विरार आणि सी.एस्.टी. ते बदलापूर या परिसरातील (इन्हरव्हील ३१४ डिस्ट्रिक्ट) ४६ क्लबचं नेतृत्व करताना त्यांनी सर्व सभासदांना बरोबर घेऊन अनेक उपक्रम यशस्वी केले. त्यातील वानगीदाखल हे काही. - कुष्टरोग निवारण समिती, नेरे पनवेल येथे प्रौढ साक्षरता, शिवण, महिला सरपंच शिक्षण या विषयातील प्रशिक्षण केंद्र सुरू झालं, 'पाणी अडवा पाणी जिरवा' या प्रकल्पांतर्गत शांतीवनात बांध बांधून पाणी जमा होईल, अशी व्यवस्था करण्यात आली. याच ठिकाणच्या आदिवासी मुलींसाठी बांधलेल्या आश्रमशाळेच्या इमारतीचं नूतनीकरण करून तो परिसर सोलर लाईट्सनी उजळून टाकला. २२ आदिवासी जोडप्यांचे विवाह लावून दिले. अशा अनेक छोट्यामोठ्या कामांचा हा २५ लाख रुपयांचा प्रकल्प केवळ २ महिन्यात पूर्ण केल्याबद्दल इंटरनॅशनल प्रेसिडेंट लेडी आयनल हरसंट व जॉन हरसंट यांनी ३१४ डिस्ट्रिक्टच्या सेवाकार्याचं तोंडभरून कौतुक केलं. पुढे प्रकल्पप्रमुख या नात्याने बाईंनी दरवर्षी विविध क्षेत्रात आपला ठसा उमटवला.

कोणत्याही प्रकल्पासाठी पैसा उभा करताना आधी स्वत:चा हिस्सा घालायचा, अहवाल तयार करायचा आणि मगच इतरांकडे मागणी करायची ही शिस्त लावून घेतल्याने 'सुनीताबाई आहेत ना, मग डोळे मिटून पैसे द्या.' हा विश्वास निर्माण झाला. वरील तत्त्वाला अनुसरून बाईंनी रोटरीच्या 'सेव्ह द चाईल्ड' या जागतिक स्तरावरील प्रकल्पाला ५० हजार डॉलर्सचं योगदान दिलं. जो न्याय दारी तोच घरी. म्हणूनच त्यांच्या घरात घरकाम करणाऱ्या बाईंना चार वर्षापूर्वी जेव्हा कर्करोगानं गाठलं, तेव्हा देवधर बाईंनी केलेल्या दोन लाख रुपयांच्या मदतीनं पुन्हा उभं राहता आलं.

देवधर पतीपत्नीनी ज्या संस्थांच्या जडणघडणीत योगदान दिलं त्यांची नावं अशी... सार्वजनिक शिक्षण संस्था, मुलुंड विद्यासंस्कार, एस. एच वझे इंग्रजी शाळा, लोकमान्य इंग्रजी शाळा, पुरंदरे हायस्कूल, नाईट कॉलेज, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, रोटरी स्कूल फॉर डेफ, व्ही. जी. वझे कॉलेज, मुलुंड व ऐरोली येथील महाराष्ट्र सेवा संघ, यासाठी त्यांना मुलुंड परिसरातील सार्वजनिक जीवनाचा चालताबोलता शब्दकोष असं म्हटलं जातं.

'महाराष्ट्र सेवा संघ' या संस्थेचं नवी मुंबईत सांस्कृतिक केंद्र व्हावं यासाठी ऐरोली गावात इमारत बांधायचं ठरलं तेव्हा म्हणजे १९९८ मध्ये मधुकर देवधर अध्यक्ष होते. त्यांनी दिलेल्या २५ लाख रुपयांच्या देणगीतून हा प्रकल्प आकाराला आला. त्यावेळी ऐरोलीत मुख्यत्वे कामगार वस्ती होती.

स्त्रियांना तर सुधारणांचा वारादेखील नव्हता. त्यांच्या सर्वांगीण प्रगतीची धुरा देवधरबाईंनी उचलली आणि त्यासाठी 'मैत्री' या मुक्त व्यासपीठाची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून गेली १० वर्षे सातत्याने चालू असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांमुळे इथल्या स्त्रियांमध्ये एवढा बदल झालाय की पूर्वी नाव सांगतानासुद्धा कचरणाऱ्या बायका आता इंटरनेटवरून हवी ती माहिती शोधू लागल्यात.

शाळकरी मुलांसाठी केवळ दिडशे रुपयात दहा दिवसांचं संस्कार शिबिर हा मैत्री संघटनेचा आणखी एक विशेष उपक्रम. यासाठी तर एकदा बाईंनी एका कुंभाराला त्याच्या भल्यामोठ्या चाकासह बोलावून मुलांना मडकी बनविण्याचे प्रात्यक्षिक दाखवलं होतं. ऐरोलीतील या सांस्कृतिक केंद्राची दखल नवी मुंबई महानगरपालिकेनेही घेतली आणि १७ सेक्टरमधील त्या चौकाचं म. बा. देवधर चौक असं नामकरण करण्यात आलं.

गेल्या तीन वर्षापासून महाराष्ट्र सेवा संघ मुलुंड आणि अंधांसाठी काम करणारी नॅब यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा संघाच्या जागेत दहावी नापास व अभ्यासात खंड पडून मागे पडलेल्या अंध मुलांसाठी नियमित अभ्यासवर्ग सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमाची धुराही मुख्यत्वे बाईंवरच आहे. याच वर्षापासून सेवासंघाने सुरू केलेल्या सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कारासाठीची आर्थिक सोयही बाईंनी त्यासाठी दिलेल्या २ लाख रुपयातून करण्यात आली आहे.

वरवर पाहिलं तर बाई कडक वाटतात. पण आत कमालीच्या मृदू आहेत, याचं एक बोलकं उदाहरण - मधुकर देवधर रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर असताना बाईंना अनेकदा त्यांच्याबरोबर बैठकांसाठी ताजमहाल हॉटेलमध्ये जावं लागे. यासंबंधी शाळेत ऑफिस स्टाफ व शिक्षक यांच्यामध्ये मागून चर्चा चाले. हे समजल्यावर एकदा बाई त्यांना म्हणाल्या, ''तुम्हाला बघायच आहे का ताज? मी एकदा घेऊन जाते.'' बोलल्याप्रमाणे एक दिवस बाई खरच त्या सात-आठ जणांना ताजमध्ये जेवायला घेऊन गेल्या. तिथे मॅनेजर पदावर काम करणारा बाईंचा विद्यार्थीच निघाला. त्याने संपूर्ण हॉटेल आतून बघण्याची व्यवस्था केली. त्यावेळी म्हणजे २०-२५ वर्षांपूर्वी बिलावरचा दहा हजार रुपयांचा आकडा पाहून मंडळी हबकूनच गेली.

असंच एकदा दहावी अ ची वर्गशिक्षिका असताना बाईंनी सहज म्हटलं, ''आपल्या वर्गाचा १००% रिझल्ट लागला तर माझ्याकडून पार्टी, तीही हॉटेलमध्ये.'' त्यावेळी म्हणजे ४५ वर्षांपूर्वी हॉटेलमध्ये खाण्याचं कोण कौतुक! मुलांनी खरोखरच बावन्नकशी यश मिळवलं आणि बाईंनीही आपल्या शब्दाला जागून आपल्या ५० विद्यार्थ्यांना मुलुंडच्या सुप्रसिद्ध विश्वभारती हॉटेलात नेलं. त्या लकी बॅचची मी एक विद्यार्थीनी. त्यादिवशी आम्ही सर्वजण जमिनीपासून चार बोटं वर तरंगत घरी आलो. आज इतक्या वर्षांनंतर का होईना पण गुरूऋण फेडण्याची अंशत: संधी मिळाली यापेक्षा दुसरा आनंद तो कोणता?

(दै. लोकसत्ता च्या शनिवार दि. २० जून २०१५ च्या चतुरंग पुरवणीतून साभार.)

---

## कु. आदिती अजय देवधरचे सुयश

इंटरनॅशनल ऑलिम्पियाड ऑफ इंग्लिश लँग्वेज २०१४-१५ मध्ये इयत्ता ५ वी च्या गटात 'कास्य पदक' मिळाले. ती डी.ई.एस. स्कूल मध्ये शिकत आहे.

कु. आदितीचे हार्दिक अभिनंदन.

***

# अमृतमहोत्सवी कुलबंधू-भगिनी

| क्र. | नाव | पान क्र. | पत्ता | जन्मदिनांक |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. मधुकर शंकर | ९ | तरसाळी, बडोदा | १४ ऑगस्ट १९४० |
| २) | श्री. अरविंद परशुराम | २० | लालवाणी मार्ग, मुलुंड | १ सप्टेंबर |
| ३) | श्री. गणेश यशवंत | ३० | नागोबा आळी, भोर | २० सप्टेंबर |
| ४) | सौ. रोहिणी बाळकृष्ण | ५३ | सारस सोसा., पुणे | ११ मे |
| ५) | सौ. शामला श्रीनिवास कुंटे | ६५ | वर्धा | १५ जानेवारी |
| ६) | श्री. विनायक विठ्ठल | ७४ | कोल्हापूर | १६ ऑगस्ट |
| ७) | श्री. मधुकर रामचंद्र | ७८ | विश्रामबाग, सांगली | १ जानेवारी |
| ८) | सौ. लक्ष्मी विष्णू | ७८ | टिळक नगर, गोरेगांव | १३ मार्च |
| ९) | श्रीमती जयश्री यशवंत | १०८ | कोथरूड, पुणे | १९ जुलै |
| १०) | सौ. अनुराधा वसंत दामले | ११३ | अंधेरी | १० ऑगस्ट |
| ११) | सौ. नीला बाळकृष्ण | १३० | सदाशिव, पुणे | १९४० |
| १२) | सौ. कुसुम श्रीधर अभ्यंकर | १३६ | इंदोर | २८ एप्रिल |
| १३) | श्री. सुधाकर गणेश | १४५ | डोंबिवली, पूर्व | १४ एप्रिल |
| १४) | सौ. सुमती रामचंद्र वेलणकर | १६९ | पुणे | १४ मार्च |
| १५) | श्री. रमेश पुरुषोत्तम | १८८ | जबलपूर | १९४० |
| १६) | सौ. शैलजा प्रभाकर | २०४ | वर्धा रोड, नागपूर | २ जून |
| १७) | सौ. उर्मिला जयंत | २२६ | कोतवाल नगर, नागपूर | १४ एप्रिल |
| १८) | श्री. विजय मोरेश्वर ढमढेरे | २४९ | सदाशिव, पुणे | १० ऑक्टोबर |
| १९) | श्री. धनंजय कृष्णाजी ढमढेरे | २६२ | आदर्शनगर, वरळी | ३१ जानेवारी |
| २०) | सौ. पद्मा बाळकृष्ण वर्तक | ३०८ | पाली, सुधागड | ७ ऑक्टोबर |
| २१) | श्री. सतीश गोपाळ | ३१० | नाशिक | २४ ऑगस्ट |
| २२) | सौ. पद्मजा कृष्णाजी | ३१५ | डोंबिवली | २४ जुलै |
| २३) | सौ. विद्या आप्पासाहेब बराटे | ३२२ | कोल्हापूर | २९ मार्च |
| २४) | श्री. रवींद्र गजानन | ३२४ | सदाशिव, पुणे | ५ फेब्रुवारी |
| २५) | सौ. सुनेत्रा श्रीधर | ३२५ | पर्वती, पुणे | २८ जुलै |
| २६) | श्री. काशिनाथ महादेव | ३३९ | गोखले मार्ग, ठाणे | १९ नोव्हेंबर |
| २७) | श्रीमती सुधा भास्कर | ३४६ | सदाशिव, पुणे | २ एप्रिल |
| २८) | श्री. प्रभाकर लक्ष्मण | ३८८ | भुसावळ | १९४० |
| २९) | श्रीमती वासंती दत्तात्रय | ४०० | दत्तमंदिर, वाई | १६ एप्रिल |
| ३०) | सौ. जानकी बाळकृष्ण घोलप | ४१० | त्रिपुटी, सातारा | १९४० |
| ३१) | सौ. जयश्री केशव | ४२६ | धर्मपुरी, वाई | ४ मार्च |
| ३२) | श्रीमती नलिनी गणेश | ४३६ | मराठे कॉलनी, दहिसर | १४ डिसेंबर |
| ३३) | सौ. द्वारका प्रभाकर वैद्य | ४३८ | रोहा | १ जून |
| ३४) | सौ. कल्पना सुधाकर शेंडे | ४४७ | नाशिक | १९४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५) | सौ. लक्ष्मी नारायण करंदिकर | ४७२ | कोर्ले, देवगड | १९४० |
| ३६) | श्री. सुरेश रामचंद्र | ४८४ | चेंबूर | १३ सप्टेंबर |
| ३७) | सौ. भाग्यश्री नरहर जोगळेकर | ४८५ | पुणे | १९ जानेवारी |
| ३८) | श्रीमती आशा विजय | ५०४ | भवानीशंकर, दादर | १ मार्च |
| ३९) | श्री. श्रीधर मुरलीधर | ५१३ | कर्वेनगर, पुणे | ७ फेब्रुवारी |
| ४०) | श्री. अनंत वासुदेव | ५१६ | चिखले, पनवेल | १९४० |
| ४१) | श्री. मनोहर यशवंत | ५४४ | विजयदुर्ग, देवगड | १९ जून |
| ४२) | सौ. मधुमती मधुकर जोशी | ५८६ | पनवेल | १५ मार्च |
| ४३) | सौ. सुलभा दत्तात्रय साठे | ५८८ | माखजन, रत्नागिरी | २४ आक्टोबर |
| ४४) | सौ. शुभदा नरसिंह गाडगीळ | ६०८ | कोळसेवाडी, कल्याण | १० जुलै |
| ४५) | श्री. प्रभाकर राजाराम | ६१४ | नाधवडे, वैभववाडी | १५ जुलै |
| ४६) | सौ. सुलभा अनंत दीक्षित | ६७१ | टिळकनगर, डोंबिवली | ६ ऑक्टोबर |
| ४७) | श्रीमती उषा परशुराम दीक्षित | ६७७ | पडवे, राजापूर | १६ डिसेंबर |
| ४८) | सौ. सुशिला श्रीकृष्ण दीक्षित | ६७९ | केळकर रोड, दादर | १९४० |
| ४९) | श्री. वसंत नारायण दीक्षित | ६८० | टोपिवाला, गोरेगांव | २२ फेब्रुवारी |
| ५०) | श्री. मधुकर वामन दीक्षित | ७८५ | नायगाव, ठाणे | २५ सप्टेंबर |
| ५१) | सौ. छाया अनंत दीक्षित | ७८६ | तेजपाल, पार्ले | ४ नोव्हेंबर |
| ५२) | सौ. शैलजा शंकर फाटक | ७९६ | कसबा, संगमेश्वर | १९४० |
| ५३) | श्रीमती स्मिता वामन | ८०४ | मार्कडी, चिपळूण | २५ डिसेंबर |
| ५४) | श्री. अनिल विद्याधर | ८१० | कोथरूड, पुणे | ९ एप्रिल |
| ५५) | श्री. सुरेश शंकर | ८२९ | पुणे | २७ सप्टेंबर |
| ५६) | सौ. अचला रघुनाथ बाबकर | ८३५ | ग्वाल्हेर | १२ फेब्रुवारी |
| ५७) | सदाशिव गौतम | ९१६ | नवीदिल्ली | १६ जून |
| ५८) | सुनंदा विनोद देशमुख | ९४० | फ्लॉरिडा | ८ मे |
| ५९) | अशोक त्रिंबक | ९५२ | विजयनगर, अंधेरी | ४ मार्च |
| ६०) | शैलजा वासुदेव मराठे | ९५२ | जबलपूर | १ जुलै |
| ६१) | प्रभाकर गोपाळ | ९७९ | उमरखेड,यवतमाळ | ८ ऑगस्ट |

## कळकळीची विनंती व आवाहन

ज्या व्यक्तींचा जन्म १९४० मध्ये झाला आहे त्यांचा सत्कार आगामी वार्षिक संमेलनात होणार आहे किंवा त्यानंतर होणाऱ्या मकरसंक्रांती संमेलनात होणार आहे. ज्या व्यक्तींना प्रकृती अस्वास्थामुळे वरील समारंभास उपस्थित राहणे शक्य नसेल त्यांनी आपल्या प्रतिनिधीद्वारे सत्कार स्वीकारण्यासाठी व्यवस्था करावी.

वरील कालावधीत ज्यांचा जन्म झाला असेल व काही कारणांने किंवा अनावधानामुळे ज्यांचे नाव वरील यादीत समाविष्ट झाले नसेल त्यांचे निकटचे नातेवाईकांनी अशा व्यक्तींची नावे, जन्मदिवस, पूर्ण पत्ता, फोन, कूलवृत्तांत पान(घराणे) वगैरे मंडळाचे अध्यक्ष श्री. पु. गो. देवधर यांजकडे कळवावी.

# देवधर मंडळाचे वार्षिक स्नेहसम्मेलन डोंबिवलीत

आपल्या देवधर मंडळाचे वार्षिक स्नेहसम्मेलन रविवार दि. २४ जानेवारी २०१६ रोजी डोंबिवली येथील कऱ्हाडे मंगल कार्यालय येथे संपन्न होणार आहे. त्यासंबंधीची विस्तृत माहिती डिसेंबर २०१५ च्या अंकामध्ये येईलच. आपल्याला आपल्या कामांचे नियोजन करून स्नेहसम्मेलनात सहभागी होता यावे यासाठी तारीख व स्थळ कळवीत आहोत.

आपण स्नेहसम्मेलनाला येणार असल्याचे जरूर कळवावे जेणेकरून आयोजन करणे सोयीचे होईल. आपल्या राहण्याच्या ठिकाणापासून जवळ राहणाऱ्या कार्यकारिणी सदस्याकडे तशी नोंद केल्यास सोयीचे होईल.

कुठल्याही हॉल / कार्यालयामध्ये माणशी किती रक्कम आकारली जाते याची आपणा सर्वांनाच जाण आहे. आयत्यावेळी धावपळ नको म्हणून आपण वाढीव संख्या सांगतो. जेवढी संख्या सांगीतलेली असते तेवढी माणसांचे बिल द्यावे लागते. आपल्याकडून माणसे कमी आली तरी बिल कमी होत नाही हे आपणास ज्ञात आहेच. मंडळाचे पैसे वाया जाऊ नये म्हणून आपण कुटुंबातील किती सदस्य येणार आहेत ते अवश्य सांगावे अशी कळकळीची विनंती.

***

## उज्ज्वल यशप्राप्त विद्यार्थी व कुलबंधु-भगिनींचे सत्कार

आपल्या मंडळाच्या वार्षिक स्नेहसम्मेलनात नेहमींप्रमाणे उज्ज्वल यशप्राप्त विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात येणार आहेत. इयत्तावार काही निकष ठेवले असून, इ. १० वी व १२ वी (दोन्हीसाठी ८५% व त्यापेक्षा अधिक गुण), पदवी प्रथम श्रेणी, पदव्युत्तर प्रथम श्रेणी, काही व्यावसायिक शिक्षण उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थी विद्यार्थीनींनी आपली नावे मंडळाच्या सचिव यांच्याकडे पाठवावीत. नावे पाठविताना आपल्या गुणपत्रिकेची सत्यप्रतही Xerox ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत पाठवावी.

## पत्ता बदलला असेल तर

आपला किंवा आपल्या नातेवाईकांचा, ओळखीच्या कुलबंधू-भगिनींचा पत्ता बदलला असेल तर तो वाटचालकडे जरूर पाठवावा. अपुरा पत्ता अथवा पत्ता सापडत नाही असा शिक्का मारून पोष्टातून परत आलेल्या नावावरील अंक पाठविणे बंद केले जाते.

कृपया पत्ता बदलल्याचे कार्यकारिणी सदस्य श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित यांचेकडे कळवून मंडळास सहकार्य करावे. त्यांचा पत्ता कार्यकारिणीच्या यादी ज्या पानावर छापली आहे त्यावर आहेच.

अंक पाठविणे थांबविण्यापेक्षा तो योग्य हाती पोहोचविण्यात मंडळास जास्त आनंद वाटतो.

धन्यवाद!

-संपादक

## मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक मदतीसंदर्भात

नेहमीप्रमाणे २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता मंडळाच्या नियमाप्रमाणे गरजू/हुशार कुल विद्यार्थ्यांना (मुले-मुली) शैक्षणिक मदत देण्यात येईल. त्यासाठी साध्या कोऱ्या कागदावर अर्ज करावे.

१) विद्यार्थ्यांचे नाव
२) गेल्यावर्षीचे गुणपत्रक (झेरॉक्स)
३) शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे/शिक्षण संस्थेचे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट
४) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जात खालील सदरांसह आपली पूर्ण माहिति लिहावी.

✻ पालकाचे नांव/पत्ता (पिन कोड/टेलिफोन नंबरसह)
✻ विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनीचे पूर्णनांव / पत्ता / जन्मदिनांक
✻ यंदा प्रवेश घेतलेली इयत्ता
✻ पालकाचे वार्षिक उत्पन्न
✻ पालकाच्या उत्पन्नाच्या दाखल्याऐवजी दोन स्थानिक प्रतिनिधींच्या किंवा दोन आजीव सभासदांच्या शिफारशी (घरांतील/नात्यातील आजीव सभासदांखेरीज)
✻ अगोदरच्या २०१४-१५ साली मिळालेले गुण.
✻ बँक खाते क्रमांक
बँकेचे नाव व शाखेचे नाव
✻ पालकांची स्वाक्षरी,
✻ तारीख (अवश्य)

अशा तऱ्हेने परिपूर्ण अर्ज १ जुलै २०१५ ते दि. २० ऑगस्ट २०१५ या कालावधीत साध्या पोष्टाने कार्यवाह सौ. सरिता देवधर यांचेकडेच पाठवावेत. हस्ते परहस्ते पाठवू नयेत.

अपूर्ण व उशिरा मिळालेल्या अर्जांवर विचार केला जाणार नाही. काही तांत्रिक कारणाने (निकालास उशीर इ.) सदर तारखेपूर्वी अर्ज पाठविता येत नसल्यास आगाऊ लेखी कळविणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे सर्व माहिति एकत्रित न आल्यास मदत पाठवणे शक्य होणार नाही.

पत्ता : सौ. सरिता मुकुंद देवधर (कार्यवाह)
११ रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६
गिरगांव, मुंबई ४. दूरध्वनी ०२२-२३८५४८११

✻✻✻

## बरं काय वाईट काय

बरं काय वाईट काय
कोण जाणे खरं काय?

घटना एक दृष्टी अनेक

एक विहरतो आनंदलहरी
दुजा बुडतो शोकसागरी

जय एकाचा
तोच पराजय दुसऱ्याचा

मान्यता मिळे एकास जगी
दुसरा तेव्हा खंत करी

मानव कल्याणा सज्ज जाहली अणुशक्ती जरी
अण्वस्त्र बनता धडकी उरी

म्हणून आपण एक करावे
बऱ्यावाईटा विसरुनी जावे
कर्तव्य आपले करीत जावे

फलाशा कधीही न मनी धरावी
भगवंत चरणी अर्पुन द्यावी

- डॉ. सुगंधा देवधर



आपल्या मंडळाची कार्यकारिणीची बैठक कार्यकारिणी सदस्य आशिष राम देवधर यांच्याकडे झाली.
अध्यक्ष श्री. पु. गो. देवधर यांनी त्यांचे आभार मानले




मंडळाच्या सभेस उपस्थित कार्यकारिणी सदस्य


## Whats app च्या माध्यमातून मिळालेली
## मुंबईच्या सुप्रसिद्ध लालबागच्या राजाची काही दुर्मीळ चित्रे























संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण–४२१३०१ येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण. पीन–४२१३०१ येथे प्रसिध्द केले फोन : (द्वारा) २२०६७३५